## महाराष्ट्र कृषि सेवा (मुख्य) परीक्षा - २०१७
## अंतिम निकालाची घोषणा
## जाहिरात क्रमांक : ०६/२०१७ व अधिसूचना क्रमांक-७०/२०१७

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे "कृषि अधिकारी, महाराष्ट्र कृषि सेवा, गट-ब (कनिष्ठ)' संवर्गातील एकूण ७९ पदांसाठी दिनांक १७ डिसेंबर,२०१७ रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र कृषि सेवा (मुख्य) परीक्षा-२०१७ चा अंतिम निकाल दिनांक १५ मे, २०१८ रोजी जाहीर करण्यात आलेला आहे. सदर परीक्षेत सातारा जिल्हयातील श्रीमती चव्हाण प्रणाली सुधीर (बैठक क्रमांक MB004120) या राज्यातून तसेच महिला वर्गवारीतून प्रथम आल्या आहेत. मागासवर्गीयातून अहमदनगर जिल्हयातील श्री.कानवडे निलेश रामदास (बैठक क्रमांक MB004116) हे राज्यात प्रथम आले आहेत.

२. उमेदवारांच्या माहितीसाठी प्रस्तुत निकाल व प्रत्येक वर्गवारीकरिता शिफारसपात्र ठरलेल्या शेवटच्या उमेदवाराचे गुण (cut off marks) आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहेत.

३. महाराष्ट्र कृषि सेवा (पूर्व) परीक्षा-२०१७ दिनांक ३० जुलै २०१७ रोजी मुंबईसह अन्य इतर तीन जिल्हा केंद्रावर घेण्यात आली होती. प्रस्तुत परीक्षेच्या पूर्व परीक्षेकरिता १७५३६ उमेदवारांना प्रवेश देण्यात आला होता. सदर परीक्षेमधून मुख्य परीक्षेकरिता १,४८९ उमेदवार अर्हता प्राप्त ठरले होते. प्रस्तुत मुख्य परीक्षा दिनांक १७ डिसेंबर, २०१७ रोजी मुंबई मध्ये घेण्यात आली आहे. लेखी परीक्षेच्या निकालाच्या आधारे मुलाखतीसाठी २५४ उमेदवार अर्हताप्राप्त ठरले. मुलाखती दिनांक १९ ते २१ एप्रिल, २०१८ या कालावधीत झाल्या.

4. अर्जात प्राविण्यप्राप्त (गुणवत्ताधारक) खेळाडूचा दावा केलेल्या उमेदवारांनी, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक १ जुलै, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार व त्यास अनुसरुन प्रसिध्द करण्यात आलेल्या दिनांक १८ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या शुध्दीपत्रकातील तरतूदीनुसार आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार **विषयांकित गट-ब पदासाठी निश्चित केलेली क्रीडा विषयक अर्हता धारण करीत असल्याबाबत, पूर्व परीक्षेचा अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक म्हणजेच दिनांक २ मे, २०१७ रोजीचे किंवा तत्पूर्वीचे क्रीडा प्रमाणपत्र व त्या संदर्भातील संबंधित विभागीय क्रीडा उपसंचालकांचा, मुख्य परीक्षेचा अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक म्हणजेच दिनांक ६ नोव्हेंबर, २०१७ रोजीचा किंवा तत्पूर्वीचा क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल नियुक्तीपूर्वी सादर करणे अनिवार्य राहील.**

५. प्रस्तुत निकाल समांतर आरक्षणाच्या मुद्यांसंदर्भात तसेच अन्य मुद्यासंदर्भात विविध मा. न्यायालयात/ मा. न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणांवरील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

६. प्रस्तुत अंतिम निकालात अर्हताप्राप्त / शिफारसपात्र न ठरलेल्या ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची पडताळणी करावयाची आहे, अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईलवर पाठविल्याच्या दिनांकापासून १० दिवसात आयोगाकडे Online पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. (कृपया आयोगाच्या वेबसाईटवरील "उमेदवारांना सर्वसाधारण सूचना" मधील सूचना क्रमांक३.८ पहावी. )

**दिनांक : १५ मे, २०१८**
**ठिकाण : मुंबई**

**विजया पडते**
**उपसचिव,**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग.मुंबई**